# सुशीलकुमार शिंदे यांना सोलापूर विद्यापीठाची डी. लिट

**सोलापूर, (प्रतिनिधी) :** संघर्षमय जीवनातून राजकीय तसेच सामाजिक क्षेत्रात कार्याचा ठसा उमटविल्याबद्दल सोलापूर विद्यापीठातर्फे माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांना राज्यपाल चे. विद्यासागर राव यांच्या हस्ते डी.लिट पदवी प्रदान करण्यात आली.

सोलापूर विद्यापीठाच्या सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या विशेष दीक्षांत समारंभास राज्यपाल विद्यासागर राव यांच्यासह व्यासपीठावर सहकार, पणन व वस्त्रोद्योग मंत्री सुभाष देशमुख, जिल्ह्याचे पालकमंत्री विजयकुमार देशमुख, कुलगुरु एन.एन. मालदार, परीक्षा नियंत्रक विभागाचे प्रमुख डॉ. बी. पी. पाटील, कुलसचिव पी. प्रभाकर उपस्थित होते.

राज्यपाल चे. विद्यासागर राव म्हणाले की, सुशीलकुमार शिंदे यांनी




प्रतिकूल परिस्थितीवर मात करुन स्वकर्तृत्वाने मुख्यमंत्री, देशाच्या गृहमंत्री पदावर विराजमान होण्याचा मान मिळविला. मिळालेल्या संधीचे सोने करुन त्यांनी सामान्य माणसासाठी काम करुन ओळख निर्माण केली.

सत्कारास उत्तर देताना श्री. शिंदे म्हणाले, सोलापूर माझी जन्मभूमी आहे. सोलापूरच्या मातीने मला घडविले असून सोलापूर विद्यापीठाने दिलेली डी. लिट पदवी ही माझ्या आईने दिलेली पदवी आहे, असे मला गौरवाने म्हणावे वाटते. सोलापूर विद्यापीठाने अल्पावधीत केलेली शैक्षणिक प्रगतीही कौतुकास्पद आहे. विद्यापीठाचे संशोधनाच्या क्षेत्रात होत असलेले काम समाधानकारक असून यापुढे त्यांनी वेगवेगळया संशोधनात भरीव काम करावे, अशी अपेक्षाही त्यांनी यावेळी व्यक्त केली. सोलापूर विद्यापीठामुळे येथील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला वाव मिळाला असून सर्वसामान्य विद्यार्थ्यांसाठी ज्ञानाची दारे खुली झाली याचे समाधानही वाटत असल्याचे ते म्हणाले.

तत्पूर्वी राज्यपाल चे. विद्यासागर राव यांच्या हस्ते विद्यापीठाच्या बास्केटबॉल कोर्ट, व्हीव्हीआयपी अतिथीगृहाचे उद्घाटन आणि इलेक्ट्रॉनिक विभाग इमारत, बहुउद्देशीय सभागृह, आरोग्य केंद्र आणि ४०० मीटर रनिंग ट्रॅकचे भूमिपूजन करण्यात आले.

कार्यक्रमास आमदार प्रणिती शिंदे, सिद्धराम म्हेत्रे, श्रीमती उज्वला शिंदे, विद्यापीठाचे सर्व विभाग प्रमुख, विद्यापीठाशी संलग्न असलेल्या महाविद्यालयांचे प्राचार्य यांच्यासह मान्यवर पदाधिकारी, अधिकारी व सन्माननीय नागरीक उपस्थित होते.

# दुरावस्थेत असलेल्या अंधेरी कुर्ला रस्त्याच्या नुतनीकरणास सुरुवात

**अंधेरी, (संतोष गावडे) :** सर मथुरादास वसनजी मार्ग' हे मुळ नाव असणाऱ्या परंतु, अंधेरी कुर्ला रोड ह्या नावाने प्रचलित असलेल्या ह्या रस्त्याची मागील काही वर्षांपासुन पार दुरावस्था झालेली होती. मुळचा सिमेंटचा असणाऱ्या ह्या रस्त्यावर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे निर्माण झालेले आहेत. वाहतुकीस, सांडपाणी किंवा पावसाळयाच्या पाण्याचा निचरा होण्यास कोणताही अडथळा निर्माण होत नव्हता. आता मार्गाची ऊंची वाढविल्याने मार्गाच्या दोन्ही बाजुने असणारी आस्थापने, विविध कार्यालये आणि नागरी वस्ती यांच्या वाहतुकीत अडथळा निर्माण होण्याची भिती ह्या सर्वांकडुन

## *मात्र काही नविन समस्या निर्माण होण्याची शक्यता...*

अनेक ठिकाणी विविध चेंबर्सची झाकणे वरखाली होऊन त्यांचे रुपांतरही मोठमोठ्या खड्ड्यांमध्ये झालेले होते. संपुर्ण रस्त्यावर अनेक ठिकाणी फुटपाथची सुद्धा पार दुरावस्था झालेली होती. अशा पद्धतीने प्रचंड वाहतुक आणि वर्दळीने रात्रंदिवस गजबजलेला हा मार्ग वाहतुकीसाठी काहीसा धोकादायक बनला होता. हे सारे लक्षात घेऊन ह्या मार्गाचे नुतनीकरण आणि डागडुजी होणे अत्यंत आवश्यक बनले होते.

मात्र पालिकेने मागील साधारण महिन्याभरापासुन सदर मार्गाचे नुतनीकरण आणि डागडुजीचे काम हाती घेऊन कामास सुरुवातही केलेली आहे. कामास सुरुवात करताना ह्या मार्गाची ऊंची साधारण दिड/दोन फुटांनी वाढविण्यात आलेली आहे. मुळात हा मार्ग आता जमीनीच्या ज्या पातळीवर आहे त्याच पातळीवर मार्गाच्या दोन्ही बाजुने असणारी विविध आस्थापने, लहानमोठी कार्यालये आणि नागरी वस्ती या साऱ्यांची ऊभारणी झालेली होती. साहजिकच या सर्वांची जमीनीवरील पातळी एकसमान असल्यामुळे व्यक्त केली जात आहे. तसेच रोजच्या सांडपाण्याचा आणि पावसाळयाच्या पाण्याचा निचरा होण्यात मोठाच अडथळा निर्माण होऊन पाणी साचण्याची भिती स्थानीकांकडुन व्यक्त केली जात आहे.

तसेच ह्या मार्गाची ऊंची वाढविल्यामुळे संपुर्ण फुटपाथ सुद्धा खाली जाऊन नागरीकांना त्याचाही त्रास सहन करावा लागणार आहे. खरेतर प्रचंड वर्दळीच्या ह्या मार्गाच्या मधोमध असलेल्या दुभाजकांची आत्ता असलेली साधारण अडीच/तिन फुटांची ऊंची कमी होऊन केवळ अर्धा फुट ऊरलेली आहे. त्यामुळे पादचाऱ्यांचे ऊठसुठ मध्येच कुठुनही रस्ता ओलांडण्याचे प्रमाण वाढुन लहान मोठे अपघात होण्याची सुद्धा दाट शक्यता निर्माण झालेली आहे. तरी पालिका प्रशासनाने ह्या सर्वच बाबींचा गांभीर्याने विचार करुन ह्या मार्गाची ऊंची कमी करावी किंवा ह्यातुन निर्माण होणाऱ्या सर्व समस्यांतुन योग्य तो मार्ग काढावा अशी ह्या मार्गाशी संबंधीत परिसरातील सर्व नागरीकांची मागणी आहे.

# सार्वजनिक बांधकाम मंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते ठाण्यातील आयलीफ रिट्झ बँक्वेट्सचे शानदार उद्घाटन!

## *अतिरिक्त खाद्यपदार्थ गरजूंना देण्याचा स्तुत्य उपक्रम*

**ठाणे, (कौशिक माधवानी) :** दिमाखदार लग्नसोहळा किंवा शानदार इव्हेंट करण्यासाठी खिशात खूप पैसे असायलाच हवेत, असं काही नाही. ठाण्यातील घोडबंदर रोड येथील आर-मॉलमध्ये नव्यानेच सुरु झालेल्या 'आयलीफ रिट्झ बँक्वेट्स'ने गुणवत्ता, लक्झरी आणि किफायतशीरपणा यांचा अनोखा संगम साधला आहे. शानदार समारंभांसाठी अत्याधुनिक सुख-सुविधांनी सज्ज अशा 'आयलीफ रिट्झ बँक्वेट्स'च्या प्रशस्त वास्तूचे उद्घाटन रविवारी सायंकाळी झाले. राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री एकनाथ शिंदे, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे आणि रुणवाल ग्रुपचे संचालक सुभाष रुणवाल यांच्या प्रमुख उपस्थितीत हा उद्घाटन सोहळा संपन्न झाला.

याप्रसंगी दीपप्रज्वलनानंतर बोलताना राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, 'गेल्या काही वर्षात




ठाणे, कल्याण, डोंबिवली, भिवंडी येथे खूप मोठ्या संख्येने गृहनिर्माण प्रकल्प साकारले गेले. वाढत्या लोकसंख्येमुळे आता मुंबई व नवी मुंबईप्रमाणे या परिसरातही व्यावसायिक सोयी-सुविधांची गरज मोठ्या प्रमाणात भासते आहे. गेल्या दोन दशकांच्या काळात सांस्कृतिक शहर ते व्यावसायिक शहर असा ठाण्याचा प्रवास झपाट्याने झाला आहे. त्यामुळे या परिसराला, विशेषत ठाण्यात अत्याधुनिक अशा बँक्वेट्सची, कॉर्पोरेट इव्हेंट्ससाठीच्या विविधी सोयीसुविधांनी संपन्न अशा सभागृहांची गरज आहे.'

आयलीफ रिट्झ बँक्वेट्सचे तरुण संचालक प्रतीश आंबेकर, अभिषेक कदम या दोन तरुणांचाही एकनाथ शिंदे यांनी आपल्या भाषणात गौरव केला. बँक्वेट्समधील सोहळयांसाठी बनवले जाणारे अतिरिक्त जेवण तसंच शिल्लक खाद्यपदार्थ गरजूंना देण्यात येणार आहे. ठाण्यातील 'मा निकेतन' या सेवाभावी संस्थेसोबत 'आयलीफ रिट्झ बॅक्वेट्स' हा उपक्रम राबविणार असून येथील प्रत्येक सोहळयानंतर 'मा निकेतन' संस्थेचे कार्यकर्ते अतिरिक्त खाद्यपदार्थ गरजूंना देण्यासाठी घेऊन जाणार आहे.

अभिनेत्री श्रुती मराठे तसंच सुबोध रुणवाल आणि संदीप रुणवाल आदी मान्यवर सुद्धा या उदघाटन सोहळयाला उपस्थित होते. आयलीफ रिट्झ बँक्वेट्सचे व्यवस्थापकीय संचालक प्रतीश आंबेकर यावेळी म्हणाले की, 'ठाण्यातून आम्ही सुरुवात केली असली तरी लवकरच देशात विविध ठिकाणी आम्ही अशाच प्रकारच्या बॅंक्वेट्सची साखळी उभी करणार आहोत'. तर, 'सेलिब्रेशन- उत्सव हा सर्वांनाच आवडतो. तो सर्वांच्या खिशाच्या आवाक्यात यावा, किफायतशीरपणे त्याचा आनंद सर्वांना घेता यावा, याला आमचे प्राधान्य असेल,' असं मत आयलीफ रिट्झ बँक्वेट्स संचालक अभिषेक कदम यांनी व्यक्त केलं.

# डोंगरी पोलिसांनी चोरांना केले चतुर्भुज

**मुंबई, (दिनेश मराठे) :** दुकानात येण्याजाण्यास अडथळा होतो म्हणून महानगर पालिकेने बसविलेल्या रॅलिंग तोडून चोरी करण्याच्या अरोपाखाली दुकानाचा मालक इक्बाल उस्मान आणि नोकर मैनुर रेहमान शेख या दोघांना पोलिसांनी अटक केली.

या संदर्भातील पोलिस सूत्रांकडून प्राप्त माहिती नुसार डोंगरी चारनळ येथील हबीब बिल्डिंग पदपथावर महानगर पालिका बी विभागाने स्टेनलेस स्टीलची रॅलिंग (सुरक्षा कठडे) बसविलेली होती. त्या मुळे आपल्या दुकानात येण्यास अडथळा आणणाऱ्या या स्टेनलेस स्टीलच्या रॅलिंग अटकेतील आरोपींनी कापुन मालक इकबाल उस्मान यांनी माझगाव येथील स्वतःच्या घरात लपविले.

पालिकेने बसविलेली रॅलिंग चोरीला गेल्याची तक्रार बी वार्डचे कनिष्ठ अभियंता सचिन खरात यांनी डोंगरी पोलिसात तक्रार करताच,१९ मार्च रोजी भा.दं.वि. ३७९ नुसार चोरीचा गुन्हा दाखल करुन पोलिसांनी पंचनामा केला.सपोनि अरुण थोरात यांच्या मार्गदर्शना नुसार पोलिस उपनिरीक्षक सचिन पालवे, सोमनाथ हंडाळ, नीलेश बनकर, संदीप पिसे यांनी तपास करुन आरोपीना अटक केली.

# युबीएम इंडियाच्या कॉंक्रिट शो इंडियाच्या ५व्या सत्राचे#बांधकाम व शहरविकास बाजारपेठेवर लक्ष

**मुंबई, (प्रतिनिधी) :** युबीएम इंडियाने कॉंक्रिट शो इंडिया (सीएसआय)च्या पाचव्या सत्राची घोषणा नुकतीच केली असून दरवर्षी भरणारे हे प्रदर्शन बांधकाम व शहरविकास या दोन क्षेत्रांशी संबंधित असते. रस्ते, महामार्ग, गृहनिर्माण, विमानतळे, बंदरे, ऊर्जा, रेल्वे, धरणे आणि पुल यासारख्या सर्व सुविधांचा समावेश असलेला कॉंक्रिट शो इंडिया २०१७ हा शो ४ ते ६ मे २०१७ या कालावधीत मुंबईतल्या गोरेगाव येथील बॉम्बे कन्व्हेन्शन ॲण्ड इक्झिबिशन सेंटर (बीसीईसी) येथे आयोजित करण्यात येणार आहे.

कॉंक्रिट शो इंडिया या उपक्रमात कॉंक्रिट आणि बांधकाम, बांधकामात लागणारी उपकरणे, बांधकामासाठी आवश्यक रसायने, व्यावसायिक व औद्योगिक फ्लोअरिंग्स आदी क्षेत्रांतील नवनवीन गोष्टींची माहिती देण्यात येणार आहे. ऑटोमेशन्स, सॉफ्टवेअर आणि आयटी सिस्टम तसेच, बांधकाम उपकरणे व हत्यारे यांचा समावेश असलेला ब्रिल्डटेक हा नवीन पर्याय या शोमध्ये समाविष्ट करण्यात येणार आहे. या तीन दिवसांच्या शोमुळे स्थापत्यविषारद, सिव्हील इंजिनियर्स, कन्सल्टंट्स, कंत्राटदार, विकसक, पुरवठा व्यवस्थापक आणि विविध बड्या बांधकाम व शहरविकास कंपन्यांतील सल्लागारांचे चर्चासत्र आयोजित करण्यात येणार आहे.

या उपक्रमात १०० हून अधिक प्रदर्शकांचा सहभाग असणार आहे. यात ल्यूसीड कोलाईड्स लिमीटेड, बियान्ची कॅसेफॉर्मे इंडिया प्रा. लि., रेक्ली इंडिया, हायक्रेट डेकोरेटिव्ह सिस्टम्स प्रा.लि., अटलास कॉप्को (इंडिया) लि., कॉंक्रिट ॲडेटिव्हस ॲण्ड केमिकल्स प्रा. लि., स्कायवे आरएमसी प्लण्ट्स प्रा. लि., गेदरेज कन्स्ट्रक्शन्स, अपोल्लो इन्फ्राटेक प्रा. लि., अश्टेक, श्रीराम पॅनल्स, राईट क्यू ग्रीन, मासा कॉंक्रिट प्लाण्ट्स इंडिया लि., डब्ल्यूएएम इंडिया लि., जेके सिमेंट लि. या कंपन्यांचा समावेश असणार आहे. तर, चीन, जर्मनी, इटली आणि कोरिया हे देश सहभागी होणार आहेत.

कॉंक्रिट शो इंडिया २०१७ या उपक्रमाला इंडियन कन्स्ट्रक्शन इक्वीपमेंट्स मॅन्यूफॅक्चरर असोसिएशन (आयसीईएमए), इंडियन कॉंक्रिट इन्स्टिट्यूट (आयसीआय), कन्स्क्शन केमिकल्स मॅन्यूफॅक्चरर असोसिएशन (सीसीएमए), सीमेंट मॅन्यूफॅक्चरर असोसिएशन (सीएमए), कन्सल्टिंग इंजिनिअर्स असोसिएशन ऑफ इंडिया (सीईएआय), कन्स्ट्रक्शन इंडस्ट्री डेव्हलपमेंट काऊन्सिल (सीआयडीसी), रेडी मिक्स्ड कॉंक्रिट मॅन्यूफॅक्चरर असोसिएशन (आरएमसीएमए), इंडियन इन्स्टिटयूट ऑफ ब्रिज इंजिनिअर्स (आयआयबीई) आणि इन्फ्रास्ट्रक्चर इंडस्ट्री ॲण्ड लॉजिस्टिक्स फेडरेशन ऑफ इंडिया (आयएलएफआय), इंडियन असोसिएशन ऑफ स्ट्रक्चरल इंजिनिअर्स (आयएस्ट्रक्टई), इंडियन सोसायटी ऑफ स्ट्रक्चरल इंजिनिअर्स (आयएसएसई), ऑन्टारिया बिल्डिंग एन्व्हलप काऊन्सिल (ओबीईसी), प्री इंजिनिअर्ड स्ट्रक्चर्स सोसायटी ऑफ इंडिया (पीएसआय) यांसारख्या विविध कंपन्यांकडून या उपक्रमाला अर्थसहाय्य देण्यात आले.

यूबीएम इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक श्री. योगेश मुद्रस यांनी सांगितले की, २०१७-१८ या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पात सरकारने शहरविकास क्षेत्राला दिलेले प्रोत्साहन पाहता, यामुळे या क्षेत्रातल्या भागीदारांच्या क्षमता वाढण्यास मदत होणार आहे. रस्तेविकास, रेल्वे, विमानतळे आणि अन्य स्मार्ट शहरासाठी आवश्यक असलेल्या उपक्रमांच्या बाबतीत सरकारने राबवलेल्या सक्रीय धोरणांमुळे वर्ल्ड बँकेच्या लॉजिस्टिक्स परफॉर्मन्स इंडेक्स (एलपीआय) २०१६ साठी भारताचा १६० देशांमध्ये ३४ वा क्रमांक लागला आहे. भारतीय बांधकाम उपकरणांचे क्षेत्र गेल्या काही वर्षांपासून डबघाईला आले होते, ते आता बऱ्यापैकी विकसित होत असून २०१९-२० या आर्थिक वर्षात या क्षेत्राचा विकास ५ दशलक्ष अमेरिकन डॉलरनी वाढणार असल्याचा अंदाज आहे.

# वैद्यकीय पदव्युतर अभ्यासक्रमाचे सर्व प्रवेश एकत्रित समुपदेशनाद्वारे

**मुंबई, (प्रतिनिधी) :** राज्यातील शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून शासकीय किंवा महापालिका वैद्यकीय महाविद्यालयांतील अखिल भारतीय कोटा वगळता राज्यातील सर्व प्रकारच्या वैद्यकीय महाविद्यालयांतील पदव्युतर अभ्यासक्रमाच्या (MD/MS/Diploma/DM/MCh) सर्व जागांवरील प्रवेश हे एकत्रित समुपदेशनाद्वारे करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. यामध्ये संस्थात्मक कोटा किंवा एनआरआय कोटा याचाही समावेश राहणार आहे.

वैद्यकीय महाविद्यालयांतील पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या सर्व जागांवरील प्रवेश हे एकत्रित समुपदेशनाद्वारे प्रवेश नियमांमध्ये आवश्यक ते बदल किंवा सुधारणा करण्याची कार्यवाही लवकरात लवकर करण्यात येणार आहे. या सर्व बाबींची एकत्रित समुपदेशनाद्वारे प्रवेशप्रक्रिया राबविण्याची जबाबदारी ही आयुक्त राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष याची राहील.




# आयआयएचएमआर युनिव्हर्सिटीतर्फे सार्क देशांमधून मास्टर ऑफ पब्लिक हेल्थ (एमपीएच) अभ्यासक्रम २०१७ साठी अर्ज मागवण्यात आले आहेत

**मुंबई, (कौशिक माधवानी) :** जॉन हॉपकिन्स युनिव्हर्सिटी ब्ल्यूमबर्ग स्कूल ऑफ पब्लिक हेल्थ (जेएचएसपीएच) तर्फे भारतात मास्टर ऑफ पब्लिक हेल्थ (एमपीएच) पदवी उपक्रम, आयआयएचएमआर युनिव्हर्सिटी, जयपूरबरोबर संलग्नितपणे सादर करण्यात आला आहे. पब्लिक हेल्थमधील हा पदविका अभ्यासक्रम दोन वर्षांचा पूर्णवेळ अभ्यासक्रम असून, यात एकूण ३० जागा आहेत. ऑक्टोबर २०१७ मध्ये सुरू होत असलेल्या पाचव्या बॅचसाठी अर्ज स्वीकारण्यात येत आहेत. गेल्या चार बॅचपैकी बहुतांश विद्यार्थ्यांना चांगल्या ठिकाणी संधी मिळाली आहे, एमपीएच उपक्रमासाठी भारत, श्रीलंका, बांगलादेश, नेपाळ, भूतान, पाकिस्तान, अफगाणिस्तान आणि म्यानमार आदी देशांतून अर्ज स्वीकारले जात आहेत.

आयआयएचएमआर युनिव्हर्सिटीचे अध्यक्ष डॉ.एसडी गुप्ता म्हणाले की, ''गेल्या शतकात पब्लिक हेल्थ आश्चर्यकारकरीत्या बदलले आहे. जॉन हॉपकिन्स युनिव्हर्सिटी-आयआयएचएमआर युनिव्हर्सिटी मास्टर ऑफ पब्लिक हेल्थ (एमपीएच) तर्फे दोन्ही संस्थांचे सबल स्थान दर्शवते. दक्षिणा आशियातील पब्लिक हेल्थमधील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी विद्यार्थ्यांना आवश्यक असेलले ज्ञान देणे असे या उपक्रमाचे उद्दिष्ट्ये आहे, यासाठी जेएचएसपीएचची सर्वोत्कृष्टता आयआयएचएमआर युनिव्हर्सिटीतील हेल्थ मॅनेजमेंट संशोधनातील तज्ज्ञता उपलब्ध असणार आहे. पब्लिक क्षमतांचा विकसनशील देशांमध्ये विकास होण्याची अत्यंत गरज आहे, विशेषकरून दक्षिणेकडील कमी अथवा मध्यम उत्पन्नगटातील विद्यार्थ्यांसाठी. याशिवाय आपल्याला अमर्यादित क्षमता निर्माण करणे आणि पब्लिक हेल्थ शिक्षणातील व्यावसायिक कौशल्यांचा विकास करणे याची गरज आहे. यामुळेच आम्ही आमच्या अभ्यासक्रमात सुधारणा केली असून, शिक्षण देणे, संशोधनाला वाव देणे आणि अध्ययनातील अनुभव अधिक समृद्ध करणे, व्हायब्रंट, व्हाएबल, संबंधित आणि वास्तवदर्शी केल्याची खात्री देत आहोत. हे एक महत्त्वाचे कारण आहे आणि जॉन्स हॉपकिन्स-आयआयएचएमआर प्रेग्रॅम ऑफ मास्टर ऑफ पब्लिक हेल्थमधून हेच देण्याच आमचा प्रयत्न आहे.''

एमपीएचमध्ये भरघोस अनुदान मिळणे हे एक फारच चांगले काम आहे, डॉ. गुप्ता पुढे म्हणाले, ''यामध्ये आणखी एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे ती म्हणजे, विद्यार्थी यूएसएमधील इतर कोणत्याही एमपीएच अभ्यासक्रमाला गेल्यास त्यासाठी लागणाऱ्या शुल्काच्या एक-तृतीयांश इतके शुल्क आता लागणार आहे. जेएचएसपीएच /आयआयएचएमआप एमपीएच उफक्रमासाठीचे शुल्क २२००० यूएस डॉलर्स आहे. या अभ्यासक्रमाला प्रवेश मिळालेल्या विद्यशर्थ्यांना प्रवास आणि आंतरराष्ट्रीय शिष्यवृत्तीतून राहणे असा खर्च मिळेल, याअंतर्गत जॉन हॉपकिन्स ब्ल्यूमबर्ग स्कूल ऑफ पब्लिक हेल्थ, बाल्टीमोर, यूएसए येथील पब्लिक हेल्थच्या अंतर्गत संस्थेच्या प्रश्न सोडवण्यासाठीच्या दोन आठवड्यांच्या अभ्यासक्रमाला उपस्थित राहता येणार आहे.

हे दैनिक आदर्श महाराष्ट्र प्रकाशन (ओ.पी.सी.) प्रा. लि. करिता मुद्रक-प्रकाशक-संपादक श्री. रघुनाथ किसन ढेकळे यांनी सोमानी प्रिंटींग प्रेस, गाळा नं. ३/४, अमीन इंडस्ट्रीयल इस्टेट, सोनावाला क्रॉस रोड नं. २, नियर जवाहर रोड, फाटक ब्रीज, गोरेगाव (पुर्व), मुंबई - ४०० ०६३ येथे छापून ११, काझी सैय्यद स्ट्रीट, १ला मजला, ऑ.नं. ६, मस्जिद बंदर (प.), मुंबई - ४०० ००९ येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. R.N.I. No. 37874/2010 दूरध्वनी : (०२२) २३४४७७७८/६६१५७७७८/४९७०६७७८, जाहिरात विभाग : ३२२५७७७८, फॅक्स २३४२७७७८, ७६६६०८७७७८, E-mail : adarshmaharashtranews@gmail.com.